पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
*Office of The Superintendent Of Police,Nagpur District (Rural), Nagpur*
Tel No: - 0712-2566650, E-mail:- sp.nagpur.r@mahapolice.gov.in

प्रति,

महाव्यवस्थापक,
महाआयटी,मुंबई(पोलीस महासंचालक ,मुंबई)
ई-मेल-kaustubh.bhatkar@mahait.org / raunak.saraf@mahait.org

क्रमांक: नाजिग्रा/डि-९/पो.शि.भरती-२०२१/लेखी परीक्षा/२०२३-नागपूर दिनांक :- /०३/२०२३ - 2568

विषय:-पोलीस शिपाई भरती/२०२१ ची लेखी परीक्षा घेणेबाबत..

संदर्भ:-आपलेकडील पत्र क.प्रशि/पो.शि.भरती/पो.भ.२०२१/१३२/२०२०/९७०,
मुंबई दिनांक १४/०३/२०२३

---000---

उपरोक्त विषयांकित संदर्भान्वये सादर आहे की. पोलीस अधीक्षक,नागपूर ग्रामीण या आस्थापनेवर पोलीस शिपाई भरती/२०२१ ची शारीरीक चाचणी भरती प्रक्रिया पार पाडण्यात आल्याने त्यामध्ये विहित गुणांनी एकुण १४९८ उमेदवार उत्तीर्ण झालेले असून लेखी परीक्षेकरीता पात्र ठरलेले आहेत. पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी यासोबत संलग्न आहे.

सदरची पोलीस शिपाई भरती/२०२१ या पदाची लेखी परीक्षा तुळशिराम गायकवाड पाटील,कॉलेज ऑफ इंजिनिअरींग,मोहगाव,वर्धा रोड, तह.नागपूर ग्रामीण जिल्हा नागपूर,( पोलीस स्टेशन,बुट्टीबोरी हद्दीत) दिनांक ०२/०४/२०२३ रोजी घेण्याचे आयोजित केलेले आहे. त्याकरीता उमेदवारांना आपले कडून लेखी परीक्षेकरीता खालील प्रमाणे अटींच्या आधीन राहून परीक्षा केंद्रावर येतावेळेस खालील सुचना देण्यात यावी हि विनंती.

१) उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर सकाळी ६.३० वाजता हजर राहावे. कारण सर्व उमेदवारांचे बॉयोमॅट्रीक घ्यावयाचे असल्याने सकाळी येणे अनिवार्य आहे.
२) परिक्षा हॉलमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केलेली आहे.
३) प्रवेशव्दार बंद झाल्यानंतर कोणत्याही उमेदवाराला परवानगी दिली जाणार नाही.
४)परीक्षा संपल्यानंतर,कृपया पर्यवेक्षकाच्या सूचनांसाठी प्रतीक्ष करा आणि तुम्हाला सांगितल्याशिवाय तुमच्या जागेवरुन उठू नका.उमेदवारांना एका वेळी एक अशा रीतीने जाऊ दिले जाईल.
५)प्रवेशपत्र तात्पुरते असून,ते भरतीच्या अधिसूचनेत दिलेल्या पात्रतेच्या सर्व अटी पूर्ण करण्याच्या अधीन असेल.
६)उमेदवारांना सुचविले जाते की त्यांनी परीक्षेच्या ठिकाणी ०१ दिवस अगोदर भेट दयावी आणि त्या केंद्रातील पोहचण्याची व्यवस्था पहावी, जेणेकरून परीक्षेच्या दिवशी कोणतीही समस्या उद्‌भवणार नाही.परंतु परीक्षेपुर्वी भेटीदरम्यान परीक्षा केंद्रात प्रवेश प्रतिबंधित आहे.
७)विशेष पोशाख घालण्याचा धार्मिक/पारंपारिक रिवाज असेल,तर कृपया व्यवस्थित तपासणीसाठी केंद्रात लवकर प्रवेश करा.
८)कोणत्याही उमेदवाराला प्रवेशपत्र,वैध आयडी पुरावा,फोटोग्राफ आणि योग्य तपासणीशिवाय परिक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही. उमेदवाराला स्पर्श केल्याशिवाय हॅंडहेल्ड मेटल डिटेक्टरव्दारा (एचएचएडी) तपासणी केली जाईल.
९)उमेदवारांना परीक्षेच्या ठिकाणी फक्त खालील वस्तू आणण्यास अनुमती असेल.
अ) साधे पारदर्शक काळे बॉल पेन
ब)प्रवेशपत्र आणि स्वयं घोषणापत्र (वचनपत्र),दोन्ही महाराष्ट्र राज्य पोलीस संकेतस्थळावरुन डाउनलोड केल्यानुसार योग्यरीत्या भरलेले (A4 आकाराच्या कागदावर स्वच्छ प्रिंटआउट घेतलेली असावी)
क) प्रवेशपत्रावर चिकटवण्यासाठी नुकताच काढलेल्या रंगीत छायाचित्राची ०१ प्रत.
ड) वैध फोटो आयडीचा पुरावा.

१०)उमेदवाराने ''सरकारने जारी केलेल्या कोणत्याही ०१ मुळ आणि वैध ओळखपत्राचा पुरावा'' सोबत आणले पाहिजे,जसे
पॅन कार्ड/वाहनचालक परवाना/मतदार ओळखपत्र/पासपोर्ट/आधार कार्ड /ई-आधार प्रवेश क्र.इतर अन्य
आयडी/आयडीजच्या छायाप्रति,मग त्या साक्षांकित केलेल्या असल्या तरीही/मोबाईल फोनमध्ये आयडीजचे स्कॅन केलेले
फोटोज वैध आयडी पुरावे म्हणून विचारात घेतले जाणार नाहीत.

११)परीक्षा केंद्रात उमेदवारांना कोणत्याही व्यक्तिगत वस्तू सोबत बाळगण्यास परवानगी दिली जाणार नाही, ज्यात
इलेक्ट्रॉनिक उपकरणे,मोबाईल फोन्स,स्मार्ट वॉच,फिटनेस बॅंड,ब्लुटूथ डिव्हॉइस आणि इतर बंदी घातलेले/प्रतिबंधित वस्तूंचा
समावेश असेल.परीक्षेचे अधिकारी व्यक्तिगत वस्तूंचा सुरक्षिततेसाठी जबाबदार नसतील आणि त्यासाठी कोणतीही सुविधा
परीक्षा केंद्रावर केलेली नसेल.

१२)जाड सोल असलेले शुज/पादत्राणे आणि मोठे बटन्स असलेल्या कपडयांना अनुमती दिली जाणार नाही.

१३)योग्य रीतीने भरलेले आणि स्वाक्षरी केलेले प्रवेशपत्र परीक्षेच्या शेवटी पर्यवेक्षकांना सोपवणे आवश्यक असेल.असे न
केल्यास उत्तरांचे मुल्यांकन केले जाणार नाही.

१४)उमेदवारांना सल्ला देण्यात येतो की त्यांनी महाराष्ट्र राज्य पोलीस व नागपूर ग्रामीण पोलीसच्या वेबसाईटवर नियमित
अपडेट्स तपासत राहिले पाहिजे. त्यांनी अलीकडचे अपडेट्स आणि माहितीसाठी त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर
एसएमएस देखील तपासत राहिले पाहिजे.

१५)परीक्षेची पध्दत ओएमआरवर आधारित चाचणी (ऑफलाईन परीक्षा) असेल.उमेदवाराने चाचणी पुस्तिकेच्या
मुख्यपृष्ठावर,ओएमआरवर माहिती लिहिण्यासाठी आणि प्रतिसादाची वर्तुळे गडद करण्यासाठी चांगल्या गुणवत्तेचे केवळ काळे
बॉल पॉईंट पेनवापरायचे आहेत.

१६)उत्तरासाठी केवळ ०१ वर्तुळ गडद करा. तुम्ही ०१ पेक्षा अधिक वर्तुळ गडद केल्यास,त्या उत्तराचे मुल्यांकन केले जाणार
नाही.पेन्सिल,शाईचे/स्केच पेन,किंवा जेल पेनचा वापर काटेकोरपणे प्रतिबंधित आहे.

१७)उमेदवाराने हे सुनिश्चित केले पाहिजे की त्याने ओएमआर पत्रिके मधील रोल नंबर,प्रश्नपत्रिका कोड,प्रश्न पुस्तिका
क्रमांक व प्रश्न पुस्तिका मालिकेची माहिती देणारे वर्तुळ गडद केले आहे.

१८)परीक्षा हॉलमध्ये कॉपी अथवा गैरव्यवहार किंवा गैरव्यवहार करण्याचा प्रयत्न यामुळे उमेदवाराला अपात्र केले जाईल
आणि उमेदवारावर कायदेशीर कारवाई केली जाईल.

१९)परीक्षा संपण्यापूर्वी आणि संबंधित निरीक्षकाला ओएमआर उत्तरपत्रिका (उमेदवाराची प्रत) दिल्याशिवाय उमेदवाराला
परीक्षा हॉल सोडण्याची परवानगी दिली जाणार नाही.

२०)उमेदवाराने मुख्यपृष्ठाच्या शीर्षभागी लिहिलेल्या पानांच्या संख्येएवढी पाने त्या चाचणी पुस्तिकेत असल्याचे तपासावे
आणि खात्री करावी.

२१)उमेदवाराने त्या चाचणी पुस्तिकेतुन कोणतेही पान काढू नयेत आणि जर त्याच्या/तिच्या चाचणी पुस्तिकेतून कोणतेही पान
गहाळ झालेली आढळल्यास तो/ती उचित कारवाईसाठी पात्र ठरेल.

२२)ओएमआर उत्तरपत्रिकेत ०२ प्रती आहेत. मूळ प्रत आणि उमेदवाराची प्रत दोन्ही प्रती वेगळया करू नयेत किंवा
विस्थापित करू नये.चाचणीच्या शेवटी उमेदवाराने ओएमआर उत्तरपत्रिका (मूळ प्रत) निरीक्षकांजवळ सादर करणे आवश्यक
आहे आणि उमेदवाराने त्याची प्रत घेऊन जायची आहे.

२३) परीक्षेच्या शेवटी उमेदवाराने प्रवेशपत्र निरीक्षकांकडे सोपविणे आवश्यक आहे.

वरील नियमांचे पालन न केल्यास अथवा गैरप्रकार करतांना आढळल्यास उमेदवारांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

( संजय पुरंदरे )
पोलीस उपअधीक्षक(गृह)
नागपूर ग्रामीण जिल्हा नागपूर